मा. कोर्ट प्रत.

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

पोलीस स्टेशन, विमानतळ * नांदेड *

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. District (जिल्हा): नांदेड P.S. (पोलीस ठाणे): विमानतळ Year (वर्ष): 2026

FIR No. (प्रथम खबर क्र.): 0275 Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 14/06/2026 06:17 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):

1 Day (दिवस): शनिवार Date from (दिनांक पासून): 13/06/2026 Date To (दिनांक पर्यंत): 13/06/2026

Time Period (कालावधी): Time From (वेळेपासून): 12:37 तास Time To (वेळेपर्यंत): 19:15 तास

(b) Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा): Date (दिनांक): 14/06/2026 Time (वेळ): 06:10 तास

(c) General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ): Entry No. (नोंद क्र.): 009 Date and Time (दिनांक आणि वेळ): 14/06/2026 06:10 तास

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

1. (a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर): उत्तर, 01 कि.मी. Beat No. (बीट क्र.):

(b) Address (पत्ता): रनवीन आर्ट दुकानामध्ये, चैतन्यनगर, शिवमंदीर जवळ,नांदेड

(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):

District (State) (जिल्हा (राज्य)):



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अनिता विठ्ठलराव दिनकर

(b) **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1974 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, , नांदेड, विमानतळ, नांदेड, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, , नांदेड, विमानतळ, नांदेड, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-9890802038

Scanned with OKEN Scanner

7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):

Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या): 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | मिलींद शामराव दवणे | | | 1. Town/Village (शहर / गाव): दिपक नगर,तरोडाबु,नांदेड,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): भाग्य नगर,District (जिल्हा): नांदेड,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | नगदी 25,000/ रुपये व रनविर विलास भगवान यांचे फोन पे वर 15,000/ रुपये | 40,000.00 |

10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) : 40,000.00

11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):



Scanned with OKEN Scanner

फिर्याद

दिनांक 14/06/2026

मी अनिता विठ्ठलराव दिनकर, वय 52 वर्ष व्यवसायः नौकरी, पदः पदः पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड मोबाईल क्रमांक 9890802038

सरकार तर्फे फिर्यादी होवून फिर्याद देते की, मी वरील ठिकाणी सन 2025 रोजी पासून पोलीस निरीक्षक या पदावर नेमणूकीस आहे.

आम्ही दिनांक 11/06/2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट कार्यालयात हजर असतांना प्रभारी अधिकारी पोलीस उप अधीक्षक श्री राहूल तरकसे साहेब, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड यांनी त्यांचे कक्षात बोलावून मुळ तक्रारदार प्रकाश बाबाराव राठोड, वय 60 वर्शे, व्यवसाय - शासकीय गुत्तेदार, रा. मु. कनक्याचीवाडी, पोस्ट मनाठा, ता. हदगाव, जि. नांदेड, ह.मु. कृष्णाई निवास, ग्यानमाता रोड, विठ्ठल मंदिराजवळ, विठ्ठल नगर, नांदेड यांची लाच मागणी बाबतची तक्रार नोंदवुन पुढील कारवाई करणे बाबत आदेषीत केले.

त्यानंतर आम्ही मुळ तक्रारदार प्रकाश बाबाराव राठोड यांना विचारपुस केली, तेव्हा त्यांनी आम्हास कळविले की, मी मागील दोन वर्ष पासुन शासकिय गुत्तेदार गणगोत बिल्डर्स अँण्ड कंन्सट्रक्षन,कनक्याचीवाडी नांदेड म्हणुन काम करतो. सन 2024 मध्ये संत सेवालाल महाराज बंजारा लमांन तांडा समिती जि.प. नांदेड अर्तगत ग्रामपंचायत पांगरपाहड ता. किनवट जि. नांदेड येथील मा. अध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिशद नांदेड यांचे प्रशासकीस मान्यता क्रमांक 1179 दिनांक 10/10/2024 अन्वये10 लक्ष रुपयाचे संतसेवालाल महाराज सांस्कृतीक सभागृह मंजुर झाले होते.

सदर सभागृहाच्या कामाच्या निविदा काढण्यासाठी ग्रामसेवक व सरपंच यांच्या मार्फत निविदामाझे गणगोत बिल्डर्स अँण्ड कंन्सट्रक्षन,कनक्याचीवाडी नांदेड यांना देण्यात आली. निविदेच्या अटी शर्तीच्या आत सभागृहाचे काम पुर्ण करण्यात आले.सदर कामासाठी लागणारा खर्च माझ्या कंन्सट्रक्षन मार्फत करण्यात आला होता. सदर कामाचे रेकॉर्ड पुर्ण करुन जिल्हा परिशद येथे दाखल केले त्यानंतर जिल्हा ग्रामीन विकास यंत्रना नांदेड यांचे मार्फत दिनांक 31/03/2026 रोजी ग्रामपंचायतपांगरपाहड ता. किनवट जि. नांदेड यांचे खात्यावर 10 लाख रुपये वर्ग करण्यात आले. त्यापैकी ग्रामसेवक एम.एस. दवणे, ग्रामपंचायत, पांगरपाहड ता. किनवट जि. नांदेड यांनी गणगोत बिल्डर्स अँण्ड कंन्सट्रक्षनयांचे नावे 9,00,128/-रुपयाचा दिनांक 27/05/2026 रोजीचा चेकमला दिला. सदर पुर्ण रक्कमेच्या 5 टक्केच्या हिशोबाने 50 हजार रुपये माझे मला द्यावे लागेल असे म्हणाले. दिनांक 09/06/2026 रोजी ग्रामसेवक एम.एस. दवणे यांचा मोबाईल नंबर 8411888358 यावरुन माझे मोबाईल नंबर 9423306485 वर कॉल करुन म्हणाले की, तुमच्या अकांऊन्ट वर 9,00,128/-रुपये जमा झाले. माझा मला व्यवहार करा उर्वरीत रक्कमेचा चेक घेवुन जा असे म्हणुन आज दिनांक 11/06/2026 रोजी सुध्दा ग्रामसेवक एम.एस. दवणे मला मोबाईल वर संपर्क करुन माझ्या व्यवहारच काम काय झाल असे म्हणाले असता मी त्यांना म्हणालो की उर्वरीत रकमेच्या चेकवर बिडीओची सही घेवुन ये तुझा व्यवहार करुन टाकतो असे म्हणालो. आज पुन्हा संध्याकाळी 06.00 वाजेच्या सुमारास आमच्यात फोन वर बोलने होवुन आज रात्री 08.00 वाजेच्या सुमारस शिवमंदिर चैतन्य नगर नांदेड येथे भेटण्याचे ठरविले. ग्रामसेवक एम.एस. दवणे, हे मागत असलेले पैसे ही लाच



Scanned with OKEN Scanner

असल्याचे मला खात्री झाली आहे. मला त्यांना लाच देण्याची इच्छा नाही. माझे व ग्रामसेवक दवणे यांचे सोबत माझी कोणतीही दुश्मनी किंवा आर्थिक व्यवहार नाही. आज दिनांक 11/06/2026 रोजी मी ग्रामसेवक एम.एस. दवणे, यांची भेट घेण्यासाठी जाणार आहे. त्यावेळी त्यांनी माझेकडे लाचेची मागणी करुन स्वतः किंवा इतरांमार्फत स्विकारल्यास त्यांचेवर आपल्या विभागा मार्फत कायदेशीर कार्यवाही करावी. वगैरे प्रमाणे तक्रार दिली आहे.

दिनांक 11/06/2026 रोजी आम्ही गोपनीय कामाकरीता मा. अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय नांदेड येथून दोन शासकीय पंच 1) लक्ष्मीकांत दत्तागुरू अपस्तंभ, वय 53 वर्ष, व्यवसाय नौकरी, पदः मिश्रक, नेमणूक शासकीय आयुर्वेदीक व युनानी रसशाळा नांदेड, रा. फरांदे पार्क, फरांदे नगर (वाडी), नांदेड व पंच क्रमांक 2) श्री अब्दुल मतीन अब्दुल रशीद, वय 48 वर्ष, व्यवसाय नौकरी, पदः प्रयोगशाळा, तंत्रज्ञ, नेमणूकः शासकीय आयुर्वेदीक महाविद्यालय, नांदेड, रा. समीराबाग वाघीरोड, नांदेड असे पंच उपलब्ध करून घेतले होते. नमुद पंचाना आमच्या कक्षात बोलावून घेवून दोन्ही पंचासमोर तक्रारदार यांचे तक्रारीचे तोंडी कथन केले. त्यानंतर दोन्ही पंचानी तक्रारदार यांनी दिनांक 11/06/2026 रोजी दिलेली लेखी तक्रार व तोंडी कथन करीत असलेली तक्रार ही एकच असल्याची खात्री झाल्याने त्यावर दोन्ही पंचानी सहया केल्या. ज्यावर आम्ही व तक्रारदार यांनी यापूर्वीच सहया केल्या होत्या. त्यानंतर आम्ही पंच, तक्रारदार असे सर्वानुमते लाच मागणी पडताळणी आजमाविण्याचे ठरविण्यात आले.

त्यानंतर आमचे सुचनेवरुन पोकॉ/गोरपल्ले यांनी तक्रारदार व दोन्ही पंचाना डिजीटल व्हॉईस रेकाॅर्डर, मेमरी कार्ड बाबत माहिती दिली. त्यानतर पोकॉ/गोरपल्ले यांनी आमचे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे वक्तव्य डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरव्दारे एका नविन मेमरी कार्ड मध्ये ध्वनिमुद्रीत केले. ग्रामसेवक दवणे यांचे ठिकाण्याबाबत माहिती घेण्यासाठी तक्रारदार प्रकाश राठोड यांचे मोबाईल क्रमांक 9423306485 वरून ग्रामसेवक दवणे यांचे मोबाईल क्रमांक 8411888358 वर वेळ 21.25 वाजता कॉल केला असता, त्यांचा फोन बंद असल्याचे दिसून आहे.

दिनांक 12/06/2026 रोजी ग्रामसेवक दवणे यांचे ठिकाण्याबाबत माहिती घेण्यासाठी तक्रारदार प्रकाश राठोड यांचे मोबाईल क्रमांक 9423306485 वरून ग्रामसेवक दवणे यांचे मोबाईल क्रमांक 8411888358 वर वेळ 11.31 वाजता कॉल केला. तेव्हा तक्रारदार राठोड यांनी विचारणा केली की, साहेब केव्हा भेटता, त्यावर ग्रामसेवक दवणे यांनी सांगितले की, मी फोन करतो असे म्हणून फोन कॉल बंद केला. त्यानंतर वेळ 16.02 वा. तक्रारदार प्रकाष राठोड यांचे मोबाईल क्रमांक 9423306485 वरून ग्रामसेवक दवणे यांचे मोबाईल क्रमांक 8411888358 वर वेळ 11.31 वाजता कॉल केला काही संभाषण झाले परंतु मध्ये कॉल कट झाला आहे. आणखीन वेळ 16.05 वा. तक्रारदार यांनी लोकसेवक यांना कॉल करून विचारणा केली की, दवणे साहेब तेवढ्यात ग्रामसेवक दवणे हे म्हणाले की, आपण पाच वाजता चैतन्य नगरला भेटूत असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी ठिक आहे असे सांगितले.

त्यानंतर ग्रामसेवक दवणे यांनी सांगितल्या प्रमाणे वेळ 17.28 वा. तक्रारदार यांनी लोकसेवक यांना कॉल करून विचारणा केली की, आपण कुठे आहात ? तेव्हा ग्रामसेवक दवणे यांनी तक्रारदार यांना म्हणाले की, माझे मित्र मंडळी मला मोंढा येथे भेटलेले असून मी सुर्या रेस्टॉरंट मध्ये बसलेलो आहे, तुम्हाला जमत असेल तर या, घेता येते. त्यावर तक्रारदार म्हणाले की, माझे ऑपरेशन झालेले



Scanned with OKEN Scanner

आहे मला जमत नाही असे म्हणून फोन बंद केला आहे. त्यानंतर वेळ 19.03 वा. लोकसेवक दवणे यांचे मोबाईल क्रमांक वरून तक्रारदार यांचे मोबाईल क्रमांक वर फोन आला. तेव्हा लोकसेवक यांनी तक्रारदार यांना म्हणाले की, माझा इथला काम झाला आहे, तुम्ही कुठ आहे, मी येतो असे कळविले. त्यावर तक्रारदार यांनी म्हणाले की, मी सांगतो तुम्हाला फोन करून असे कळविले. त्यानंतर 19.16 वा. पुन्हा तक्रारदार यांनी लोकसेवक यांना उदईक रोजी भेटणे संबंधाने कॉल करून चर्चा केली आहे.

दिनांक 13/06/2026 रोजी तक्रारदार राठोड यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक वरून ग्रामसेवक दवणे यांचे मोबाईलवर वेळ 12.37 वा. कॉल करून म्हणाले की, दवणे साहेब मी डीएमआर. ऑफीस जवळ आलो आहे, कुठ येवू त्यानंतर लागलीच ते म्हणाले की, चैतन्य नगरच्या शिवमंदीर जवळ येतो. तुम्ही या..... असे म्हणून फोन बंद केला आहे.
त्यानंतर फोनवर ग्रामसेवक हे चैतन्यनगर शिवमंदीरजवळ भेटणार असल्याचे माहिति फोनद्वारे प्राप्त झाल्याने तक्रारदार व पंच क्रमांक 1 लक्ष्मीकांत अपस्तंभ असे दोघांना तक्रारदार यांचेजवळील चारचाकी इंडीगो वाहन क्रमांक एम.एच. 26 ए.के. 2534 ने डी.आर.एम. रेल्वे ऑफीस नांदेड येथून चैतन्यनगर येथील शिवमंदीरा जवळ नांदेड येथे लाच मागणी पडताळणी करीता डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार यांचे गळयात लटकावुन वेळ 12.41 वा. रवाना केले आहे. वेळ 13.34 वाजता तक्रारदार व पंच क्र. 01 असे परत आले.
त्यावेळी आम्ही तक्रारदार व पंच क्र. 01 यांना पडताळणी कार्यवाही दरम्यान घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारणा केली. त्यावेळी तक्रारदार व पंच क्रमांक 1 यांनी सांगितले की, तेथे मी व पंच असे दोघे ग्रामसेवक यांची भेट घेणे कामी चैतन्यनगर येथील शिवमंदीराजवळ गेलो. तेथे ग्रामसेवक दवणे येवून आमच्या सोबत गाडीत बसले. त्यानंतर आम्ही व ग्रामसेवक दवणे असे रणविर आर्ट येथे बसून पुन्हा चर्चा केली. तेव्हा ग्रामसेवक दवणे यांनी तक्रारदार राठोड यांचे गणगोत बिल्डर्स अँण्ड कन्स्ट्रक्शन यांचे नावे 10 लाख रूपयापैकी दिनांक 27/05/2026 रोजीचा 9,00,128/- रूपयाचा चेक दिलेला होता. उर्वरीत रकमेचा चेक न दिल्याने त्यासंबंधाने चर्चा केली. उर्वरीत रक्कमेचा चेक देण्यासाठी लोकसेवक दवणे यांनी तक्रारदार राठोड यांचेकडे एकूण 10 लाख रूपयाचे 5 टक्के प्रमाणे 50,000/- रूपयाची मागणी करून तडजोडअंती 40,000/- रूपये स्वीकारण्याचे मान्य केले आहे. नमुद रक्कम घेवून येण्यास लोकसेवक दवणे यांनी तक्रारदार यांना कळविले.
त्यानंतर तक्रारदार राठोड यांचेकडे रोख रक्कम 25,000/- रूपये उपलब्ध होती. उर्वरीत रक्कम 15,000/- रूपये त्याचेजवळ सध्या उपलब्ध नव्हते. त्यामुळे त्यांनी ए.टी.एम. द्वारे पैसे काढण्याचा प्रयत्न केला. परंतु ए.टी.एम. मध्ये पैसे उपलब्ध नसल्याने पैसे काढता आलेले नाही. त्यामुळे तक्रारदार यांनी पुन्हा ग्रामसेवक दवणे यांना वेळ 15.46 वा. सुमारास फोनद्वारे संपर्क करून म्हणाले की, माझेकडे 40,000/- रूपयापैकी 25,000/- रूपये नगदी उपलब्ध आहे, उर्वरीत रक्कम ए.टी.एम मधून मिळत नाही, कसे करावे असे फोनद्वारे विचारणा केली. तेव्हा ग्रामसेवक दवणे सांगितले की, तुम्ही समक्ष येवून भेटा, आपण बोलूया असे कळविले.
त्यावरून आम्ही तक्रारदार व पंच क्रमांक 2 अब्दुल नदीम असे दोघांना ग्रामसेवक दवणे यांची भेट



Scanned with OKEN Scanner

घेणेकामी चैतन्यनगर शिवमंदीराजवळ डिजीटल व्हाईस रेकॉर्डरसह तक्रारदार यांचे चारचाकी वाहनाने ला.प्र.वि. कार्यालय नांदेड येथून वेळ 16.09 वा. रवाना केले. वेळ 16.47 वाजता तक्रारदार व पंच क्र. 02 असे परत आले

त्यावेळी आम्ही तक्रारदार व पंच क्र. 02 यांना पडताळणी कार्यवाही दरम्यान घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारणा केली. तेव्हा त्यांनी आम्हास सांगितले की, आम्ही ग्रामसेवक दवणे यांची भेट घेण्यासाठी चैतन्यनगर शिवमंदीर येथे जावून त्यांची भेट घेवून त्यांना सांगितले की, माझेकडे 25,000/- रूपये रोख रक्कम आहे, तुम्हाला विश्वास असेल, नाही सोमवारी म्हणल तर मी पुर्ण देतो, ए.टी.एम. मध्ये भी पैसे नाहीत. आज शनिवार असल्याने बँका बंद आहेत. त्यावर ग्रामसेवक दवणे यांनी सांगितले की, ते तर बघा पहिले असे म्हणून तक्रारदार यांचेकडे 25,000/- रूपयाची मागणी करून स्वीकारण्याची तयारी दर्शविली. त्यानंतर त्यांचे विरूध्द लाच स्विकृती सापळा कार्यवाही करण्याचे ठरले.

तक्रारदार राठोड यांनी त्यांचे जवळील उपलब्ध असलेली रक्कम 25000/- रुपये रक्कम (ज्यात 500/- रुपये दराच्या 50 भारतीय चलनी नोटा ) पंचासमक्ष हजर केल्या. त्या नोटांचा तपशिल एका कागदावर नोंदवून घेतला. त्यानंतर पोकॉ/सय्यद खदिर यांनी लाच रक्कम 25,000/- रूपये रकमेच्या भारतीय चलनी नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन तक्रारदार यांचे शर्टच्या डाव्या खिशात अलगद ठेवून दिले.

त्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक यांची भेट घेण्यासाठी त्यांचे गळयात 17.40 वाजता डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून गळयात अडकावून पंच क्र. 1 लक्ष्मीकांत अपस्तंभ यांच्यसोबत तक्रारदार यांचे जवळील चारचाकी वाहनाने चैतन्यनगर येथे शिवमंदीराजवळ रवाना केले. त्यानंतर त्यांच्या पाठोपाठ आम्ही व सापळा पथक त्यांच्यावर नजर ठेवून त्यांच्या मागे मागे चैतन्यनगर शिवमंदीराजवळ जावून सुरक्षीत अंतरावर थांबून राहिलो. काही वेळानंतर ग्रामसेवक दवणे हे तक्रारदार यांचे वाहना जवळ आले व त्यांचेसोबत रणवीर आर्ट या दुकानामध्ये तक्रारदार यांना घेवून गेले. तेथे तक्रारदार व ग्रामसेवक दवणे यांचेमध्ये संभाषण झाले.

त्यानंतर वेळ 19.00 वा. सुमारास पंच क्रमांक 1 लक्ष्मीकांत अपस्तभ यांनी ग्रामसेवक लक्ष्मीकांत अपस्तंभ यांनी तक्रारदार यांचेकडून लाच रक्कम 25000/- रू स्वीकारल्याचे नियोजीत इशारा दिला. त्यावेळी आम्ही व सापळा पथक असे रणवीर आर्ट या दुकानात जावून तक्रारदार व पंच क्रमांक 1 यांना पैसे कोणी घेतले याबाबत विचारणा केली.

तेव्हा तक्रारदार यांनी आम्हास सांगितले की, ग्रामसेवक दवणे यांनी माझेकडील लाचेची रक्कम रणवीर आर्ट येथील लाकडी ड्राव्हर मध्ये ठेवण्यास सांगितली. त्यावरून मी पंचासमक्ष लाच रक्कम 25000/- रूपये ड्राव्हर मध्ये ठेवून दिली.

तसेच उर्वरीत रक्कम 15,000/- रूपये तक्रारदार यांचे फोन पे मोबाईल क्रमांक वरून रणवीर विलास भगवान यांचे क्यु आर कोड स्कॅन करून पाठविणेस सांगितले. त्यावरून तक्रारदार यांनी नमुद 15000/- रूपये रणवीन यांचे खातेवर ऑनलाईन फोन पे द्वारे ट्रान्सफर केली. लागलीच लोकसेवक दवणे यांनी तक्रारदार राठोड यांना दिनांक 13/06/2026 रोजी महाराष्ट्र ग्रामीण बँक, षिवणी ब्रांन्च, ता. किनवट, जि. नांदेड या षाखेतील खाते क्रमांकSB80095855314 च्या चेक क्रमांक 205097 हा रूपये 63,373/- चा धनादेश तक्रारदार यांना दिनांक 27/05/2026 ही तारीख नमुद करून त्यावर ग्राम



Scanned with OKEN Scanner

पंचायत अधिकारी ग्राम पंचायत कार्यालय, पांगर पहाड ता. किनवट, जि. नांदेड असा शिक्का मारून त्यावर स्वतः स्वाक्षरी करून सुपूर्द केला.

त्यानंतर आम्ही नमुद ड्राव्हरची पंचासमक्ष पाहणी करता त्यामध्ये एका निळसर रंगाचे पॉलीथीनवर लाचेची रक्कम 25000/- रूपये ठेवलेली होती. नमुद रक्कम व पॉलीथीनची अल्ट्राव्हायलेट लॅम्पच्या प्रकाषात पाहणी करता त्यावर ठिकठिकाणी अँथ्रासिन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसून आली आहे. त्यानंतर लोकसेवक मिलींद दवणे, ग्रामसेवक यांना ताब्यात घेवुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे घेवून आलो.

तरी आरोपी लोकसेवक मिलींद शामराव दवणे, वय 37 वर्ष, व्यवसाय नौकरी, पदः ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामसेवक), नेमणूकः ग्रामपंचायत कार्यालय दिपला नाईक तांडा, किनवट, ता. किनवट, जि. नांदेड रा. दिपक नगर, तरोडा(बु), नांदेड यांनी आपल्या ग्राम पंचायत अधिकारी या पदाचा गैरफायदा घेवून स्वतः आर्थिक फायदा करून घेण्यासाठी मुळ तक्रारदार प्रकाश राठोड यांचे गणगोत बिल्डर्स अँण्ड कन्स्ट्रक्षन कनक्याचीवाडी, नांदेड यांचे माध्यमातून संत सेवालाल महाराज सांस्कृतीक सभागृह बांधकामा संबंधाने बंजारा लमांन तांडा समिती जि. प. नांदेड अंतर्गत ग्रामपंचायत पांगर पहाड चे पार पाडलेल्या बांधकामाचे एकूण 10 लाख रकमेपैकी 900128 /-रु.चा चेक देवुन उर्वरीत रक्कमेचा चेक देण्यासाठी त्यांनी तक्रारदार यांचेकडे 5 टक्के प्रमाणे 50,000/- रू लाचेची मागणी करून तडजोडअंती 40,000/- रूपये स्वीकारण्याची पडताळणी दरम्यान तयारी दर्शविली. त्यानंतर पुन्हा तक्रारदार यांना बोलावून घेवून त्यांचेकडे उपलब्ध असलेले रु. 25,000/- रूपयाची मागणी करून सापळा कार्यवाही दरम्यान रु. 25,000 रोख स्वरुपात स्वीकारलेले आहे. तसेच उर्वरीत रु. 15,000/- रूपये रणवीर विलास भगवान यांचे फोन पे द्वारे ऑनलाईन स्वीकारलेले आहे. त्यामुळे वरील कृत्य भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम अंतर्गत गुन्हा होत असल्याने त्यांचे विरूध्द कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.

ही फिर्याद दिली सही

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** RAMDASH BABURAO SHEDGE (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):**

**No. (क्र.): to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3)



Scanned with OKEN Scanner

Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (किंवा)

(4) Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा): on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).

F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)

R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)

पोलीस ठाणे अंमलदार
पो.स्टे. विमानतळ, नांदेड

Registered by (नोंदणी अधिकारी)

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): RAMDASH BABURAO SHEDGE

Rank (हुद्दा): I (Inspector)

No. (क्र.):

14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):



Scanned with OKEN Scanner